जिल्हा परिषदा व पंचायत समित्यां कडील वाहनांची देखभाल व दुरुस्ती खर्चाची मर्यादा वाढविण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व पंचायत राज विभाग

शासन निर्णय क्रमांकः वाहन-२०२६/प्र.क्र.९७/ई-१७५६७७४/पंरा-१

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट,

मंत्रालय, मुंबई-४०००००१.

तारीख: ०६ नोव्हेंबर, २०२६.

वाचा -

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक:-जेईपी-१०९९/प्र.क्र.१२८/९९/०५, दिनांक ०९ जुलै, १९९९.

२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक:-विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५.

३) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक:-वाहन-२०१५/मंत्री-५१/प्र.क्र.५८/पंरा-१, दिनांक २९ सप्टेंबर, २०१५.

४) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक:-विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दिनांक ११ ऑगस्ट, २०२६.

प्रस्तावना:-

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी व अधिकारी आणि पंचायत समित्या यांना जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधी व जिल्हा घसारा निधीमधून वाहने खरेदी करण्यास शासनातर्फे मान्यता दिली जाते .

२. संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयास अनुसरुन संदर्भाधिन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांकडे उपरोक्त वाहनांच्या दुरुस्ती खर्चाची वार्षिक मर्यादा पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांसाठी प्रतिवर्ष रु.५०,०००/- आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांसाठी प्रतिवर्ष रु.६०,०००/- इतक्या खर्चाची मर्यादा वाहन दुरुस्तीसाठी विहित केली आहे.

३. संदर्भाधिन क्र.४ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-१९७८, भाग-पहिला मध्ये सुधारणा केल्या असून उपविभाग दोन, अ.क्र.२५, नियम क्र.६९ अन्वये "शासकीय वाहनांच्या देखभालीवरील, ती सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या दुरुस्तीसाठीच्या खर्चास मंजुरी देणेकरिता" प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकार मर्यादेत वाढ करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांचेकडील वाहनांची देखभाल व दुरुस्ती खर्चाची मर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

शासन निर्णय:-

संदर्भाधिन क्र.४ येथील दिनांक ११ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या आधारे जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांकडे मान्य असलेल्या वाहनांची देखभाल, तसेच वाहने देखाभाल व दुरुस्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे खर्चाची मर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे:-

अ) पेट्रोलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.१.०० लक्षपर्यंत,

आ) डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रु.१.२० लक्षपर्यंत,

इ) प्रत्येक इलेक्ट्रिक वाहनासाठी प्रतिवर्षी १.२० लक्षपर्यंत,

२. सदर वाढीव मर्यादा या शासन निर्णयाच्या दिनांकापासून वाचा येथील क्र.१ च्या दिनांक ०९ जुलै, १९९९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या वाहनांसाठी लागू राहील. तसेच ही सुधारित खर्चाची मर्यादा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वाहनासही लागू राहील.

३. जिल्हा परिषदेकडे विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी वर्ग असलेली वाहने अथवा योजनांच्या अंमलबजावणीसाठी वापरली जाणारी वाहने यांना दुरुस्ती खर्चासाठी त्या त्या संबंधीत विभागाने विहित केलेली मर्यादा लागू असेल.

४. संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांकडील तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वाहनांवरील देखभाल व दुरुस्तीचा खर्च संबंधीत जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या स्वनिधीतून करण्यात यावा. यासाठी कोणतेही शासकीय अनुदान अनुज्ञेय असणार नाही. तसेच हा खर्च विहित मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही, याची सर्व संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

५. संदर्भाधिन क्र.४ येथील वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ११ ऑगस्ट, २०२६ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-१९७८, भाग-पहिला मध्ये सुधारणा केल्या असून उपविभाग दोन, अ.क्र.२५, नियम क्र.६९ अन्वये शासकीय वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीच्या खर्चास मंजुरी देण्याचे जे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, त्याच अधिकारान्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या वाहनांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांना उक्त विवरणपत्राच्या रकाना क्र.६ मध्ये नमूद केल्यानुसार अटींच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय, नस्ती ई-ऑफिस क्र.१७५६७७४ वरील वित्त विभागाच्या Note#२७ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक **२०२६११०६१३३१०५२३२०** असा आहे. हे शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PREMANAND DNYANESHWAR SONTAKKE

Digitally signed by PREMANAND DNYANESHWAR SONTAKKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=248f3abd919bce9c4e68555abc7e467b111c53a87e167edcc566a40a12ae53cd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89357E84059779C4AD0939BABA47BE1D7999CB1D37B914BDF76F412B21AAC1AF, cn=PREMANAND DNYANESHWAR SONTAKKE
Date: 2026.11.06 15:51:02 +05'30'

(प्रे.ज्ञा. सोनटक्के)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे खाजगी सचिव,
४) मा.राज्यमंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे खाजगी सचिव,
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य (सर्व),
८) सर्व जिल्हाधिकारी,
९) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
१०) अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१२) सर्व सह सचिव/उप सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सभापती, पंचायत समिती (सर्व)
१४) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५) सर्व सह सचिव/उप सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सभापती, पंचायत समिती (सर्व)
१७) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१८) अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१९) निवडनस्ती पंरा-१ कार्यासन.